# सहकार आयुक्त व त्यांचे अधिकार

महाराष्ट्र राज्य शासन संपूर्ण राज्यासाठी सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचा **निबंधक** म्हणून एका व्यक्तीची नेमणूक करते. त्यालाच आपण **सहकार आयुक्त** म्हणतो. आणि अशा निबंधकास मदत करण्यासाठी निश्चित केलेल्या पदांसाठी त्या त्या स्थानिक क्षेत्रात किंवा संपूर्ण राज्यासाठी अनेक व्यक्तींची नेमणूक करण्यात येते. त्यामध्ये अतिरिक्त आयुक्त सहकारी संस्था, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सहनिबंधक / उपनिबंधक सहकारी संस्था अशी प्रामुख्याने पदनामे देवून त्यांना निबंधकांचे कोणतेही अधिकार लेखी आदेशाने दिले जातात. आणि असे सर्व अधिकारी निबंधकाच्या मार्गदर्शनाखाली, अधिपत्याखाली आणि नियंत्रणाखाली काम करीत असतात. राज्याचे सहकार आयुक्त म्हणजेच निबंधक हे संपूर्ण राज्याचे प्रमुख असल्यामुळे ते आपले मर्यादित अधिकार दुय्यम अधिकाऱ्यास प्रदान करतात. व असे दुय्यम अधिकारी सर्वसाधारणपणे राज्य, विभाग, जिल्हा व तालुका / वॉर्ड स्तरावर आपले अधिकार वापरीत असतात. आणि अशा निबंधक व दुय्यम अधिकाऱ्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नुसार म्हणजेच सहकार कायद्याप्रमाणे विशिष्ट अधिकार प्राप्त झालेले आहेत. आणि जे अधिकारी आपल्या अधिकार कक्षेच्या बाहेर प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या काम करीत असतात, ते पुर्णपणे बेकायदेशीर व त्यांना आखून दिलेल्या शासकीय सेवा शर्ती व अटीच्या विरोधातले कृत्य मानले जाते. व ही बाब अत्यंत गंभीर व फौजदारी  स्वरुपाच्या गुन्हा सदृश्य समजली जाते. सुरुवातीस निबंधक किंवा दुय्यम अधिकारी यांना सहकारी संस्था नोंदणी करण्यासंदर्भात कलम ४ नुसार अधिकार प्रदान केलेले आहेत. व हे अधिकार प्रदान करताना कलम ५ नुसार संस्थेची मर्यादित किंवा अमर्यादित दायीत्वासह नोंदणी करण्याचे अधिकार त्यांना दिलेले आहेत. ज्यामध्ये कलम ६ नुसार नोंदणीच्या अटी व शर्ती यांचे पालन करण्याची जबाबदारी निबंधकाची आहे. **परंतु कलम ७ नुसार संस्थांना नोंदणी विषयक अटी पासून सुट देण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य शासनास सामान्य किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेस नोंदणी संबंधी आवश्यक असतील अशा कोणत्याही गोष्टींपासून सुट देण्याचे अधिकार आहेत.** याचाच अर्थ असा की, राज्य शासनाच्या लेखी आदेशाशिवाय निबंधक, नोंदणी विषयक असलेल्या कायद्यातील तरतुदीच्या व्यतीरिक्त स्त:हून नोंदणीसाठी सूट देऊ शकत नाही.

संस्था नोंदणीसाठी कलम ८ नुसार विहीत नमुन्यात अर्ज करणे व सोबत उपविधीच्या ४ प्रती जोडणे आवश्यक आहे. आणि प्रत्येक प्रकारच्या संस्थेच्या नोंदणीसाठी नियम ४ नुसार किती नोंदणी शुल्क घ्यायचे याचे निश्चित धोरण ठरलेले आहे. त्यालाच आपण नमुना अ (नियम ४(१) म्हणजेच संस्थेची नोंदणी करण्यासाठीचा अर्ज असे म्हणतो. आणि त्याप्रमाणे एखाद्या प्रस्तावीत संस्थेने अधिनियम व नियम यांच्या तरतुदीचे पालन केले  तर दोन महिन्याच्या आत निबंधकाने अशा संस्थेला **नाव राखून ठेवण्याचे  प्रमाणपत्र**  संबंधितांना देण्याचा निर्णय कळविणे कायद्याने बंधनकारक आहे. आणि जर वरील कालावधीच्या आत निबंधकाने कुठल्याही कारणास्तव निकाल देण्यास कसूर केला तर, कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत तो अर्ज आपल्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे दिला पाहिजे. आणि जर निबंधक हेच स्वत: एखाद्या संस्थेचे नोंदणी अधिकारी असतील तर, त्यांनी अर्ज मिळालेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत सदरहू अर्ज निकालात काढला पाहिजे. आणि एवढे करुनही जर यात कसुर केला तर, **त्या संस्थेची नोंदणी करण्यात आली**  असे निबंधकाने १५ दिवसांच्या आत स्वत:च्या सही शिक्यानिशी संबंधितांना प्रमाणपत्र कलम ९ नुसार कायद्याने कळविणे बंधनकारक आहे.

वरील सर्व स्पष्टीकरणावरुन हे लक्षात येईल की, संस्था नोंदणी करण्याच्या अगोदर दोन महत्वाच्या पायऱ्या ओलांडणे आवश्यक आहे. पहिली पायरी म्हणजे **संस्थेचे नाव राखून ठेवण्याचे प्रमाणपत्र मिळविणे** आणि दुसरी पायरी म्हणजे **नाव राखून ठेवण्याच्या प्रमाणपत्राच्या आधारे** नियोजित संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक ती सभासद संख्या बनविणे, व त्यांचेकडून आवश्यक ती किमान रक्कम भाग रुपाने स्विकारणे व त्यानुसार त्रैवार्षिक योजना, जमा –खर्च, प्रवर्तकांची नावे, पत्ते, वय, सह्या, शिधावाटप पत्रीका तसेच स्विकारलेल्या भागांची संख्या व रक्कम इत्यादींचा समावेश करुन उपविधीच्या चार प्रतिंसह, बँक शिल्लक प्रमाणपत्रांसह वरील नियमाप्रमाणे निबंधकास पोच पावती घेवून सादर केले पाहिजे. याप्रमाणे या महत्वाच्या दोन पायऱ्या ओलांडताना संस्था प्रवर्तकांनी आपले स्वत:चे अधिकार व निबंधकाचे अधिकार तपासणे आवश्यक आहे. संस्थेचे नाव राखून ठेवण्याचे प्रमाणपत्र देताना मुख्य प्रवर्तकाचे नावे नियोजित संस्थेचे नाव व पत्यासहित नाव राखून ठेवून बँकेत खाते उघडण्यास परवानगी मिळणेबाबत प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी निबंधकाची आहे. आणि सदरहू प्रमाणपत्र मिळाल्यानंतर दोन महिन्यांच्या आत नोंदणी प्रकरण निबंधकाच्या कार्यालयात विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या बँकेत आपणास खाते खाते उघडण्यास परवानगी देण्यात आली आहे, त्या बँकेचे नाव व पत्ता देण्याची कायदेशीर जबाबदारी निबंधकाची आहे. याच्या व्यतिरीक्त कुठलेही काम करण्याचे अधिकार सहकार कायद्याप्रमाणे नोंदणी अधिकाऱ्यास प्रदान केलेले नाहीत.

अलिकडच्या काही काळात राज्याचे निबंधक व त्यांचे दुय्यम अधिकारी यांनी सहकारी संस्था नोंदणी करताना,नोंदणी करण्याच्या प्रक्रीयेत नियोजित संस्थेचे नाव राखून ठेवून बँकेत खाते उघडण्यास परवानगी देताना, तद्‌नंतर नोंदणी प्रस्ताव दाखल होण्याच्या अगोदरच्या दरम्यानच्या कालावधीत आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर जावून काम केलेले आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर, राज्याच्या सहकार आयुक्तांनी राज्यातील पतसंस्थांच्या ठेवीदारांना बँकाप्रमाणे ठेव विम्याचे संरक्षण देण्यासाठी सहकारी तत्वावर **महाराष्ट्र स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीज् डिपॉझीट गॅरंटी कार्पोरेशन लि.** या नावाची महाराष्ट्र राज्य एवढी कार्यक्षेत्र असलेली सहकारी संस्था सहकार कायद्यानुसार दिनांक २१/०७/२००३ रोजी नोंदणी करुन टाकली. ज्यामध्ये या संस्थेचे म्हणजेच **डिजीसी** चे वर्गीकरण व उपवर्गीकरण **ठेव संरक्षण देणारी संस्था** असे करुन टाकले. **ज्याची सहकार कायद्यात कुठेही तरतूद नाही.** सहकार कायद्यामध्ये वर्ग – **साधन संपत्ती संस्था** आणि उपवर्ग **क्रेडिट रिसोर्स सोसायटी** असा स्पष्ट शब्द प्रयोग असताना **ठेव संरक्षण देणारी संस्था** असे अतिरिक्त व बेकायदेशीर शब्द वापरुन **''डिजीसी''** ची नोंदणी केली. हेच मुळात बेकायदेशीर आहे. आणि नाव राखून ठेवण्याचे प्रमाणपत्र दिल्यापासून ते डिजीसीची नोंदणी करेपर्यंत **शासकीय राजमुद्रेचा** वापर करुन **देशद्रोहाचे कृत्य करुन** त्याकडे मात्र अक्षम्य असे दुर्लक्ष केले. शिवाय राज्यातील पतसंस्थांनी ज्यांच्या एक कोटी रुपयापेक्षा जास्त ठेवी आहेत, अशा केवळ ७ टक्के पतसंस्थांसाठीच अव्यवहारीक असे उद्देश जाहीर केले. **एवढेच नव्हे तर या नियोजित ठेव हमी महामंडळामध्ये पतसंस्थांनी भाग रुपाने व ठेव रुपाने रकमा जमा करण्याचे लेखी आदेश आपल्या अधिकार कक्षाच्या बाहेर जावून काढले.** परिणामी राज्यातील सहकारामध्ये काम करणाऱ्या **कार्यकर्त्यांनी व नेत्यांनी ''डिजीसी'' ही संस्था महाराष्ट्र शासन व केंद्र शासन अंगीकृत असलेली संस्था समजली** व त्यासाठी निबंधक व त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांनी राज्यातील **शेकडो पतसंस्थांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे रकमा गुंतविण्यासाठी वेठीस धरले.**त्याचा परिणाम राज्यातथिल अनेक **चांगल्या काम करणाऱ्या पतसंस्थांना या जाळ्यात अडकावे लागले.** एकेका पतसंस्थेने **१५ कोटी रुपयापर्यंत रक्कम या असंवैधानिक डिजीसी मध्ये गुंतविल्या.**आणि त्यामुळे पतसंस्था चालकांचा याप्रकरणी कुठेही गुन्हा किंवा चूक नाही. कारण ज्या संस्थेच्या उभारणीसाठी राजमुद्रेचा सर्रास वापर केला जातो.

राज्याचे सहकार आयुक्त व त्याचे दुय्यम निबंधक लेखी आदेशाद्वारे रकमा गुंतविण्यासाठी वारंवार आवाहन करतात. राज्यात जागोजागी डिजीसीसाठी मेळावे घेवून नेत्याच्या प्रत्यक्ष हजेरीत व पोलीस यंत्रणेच्या प्रत्यक्ष समोर हे कामकाज उरकले जाते. तसेच विविध वर्तमान पत्रांमध्ये या ठेव हमी महामंडळाकडून रिझर्व्ह बँक, डिआयसीजीसी, आयआरडीएच आयआरडीए इत्यादी शब्दांचा भरपूर उपयोग करुन हे महामंडळ बँकांप्रमाणे केंद्र सरकार यांनी उभी केलेली, नियंत्रण ठेवलेली व चालू केलेली विमा कंपनी आहे, असे महाराष्ट्रासहीत देशाच्या कानाकोपऱ्यात पसरवले गेले. अलिकडच्या काळात इतपर्यंत मजल पोहोचली होती की, राज्यातील जनतेने केवळ डिजीसीच्या सभासद असणाऱ्या पतसंस्थांमध्येच ठेवी ठेवाव्यात, आणि अशा प्रकारच्या बातम्या-जाहिराती टिव्ही - चॅनल व वर्तमानपत्रांमध्येही रंगविलेल्या प्रसिध्द केल्या व संपूर्ण राज्याने हे निमुटपणे सहन केलेले आहे.

वरील सर्व प्रकरणावरुन आपल्या हेही लक्षात येईल की, कुठल्याही प्रकारच्या नियोजित सहकारी **संस्थेचे नाव राखून ठेवून ठेवण्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यात त्या संस्थेत कोणी, किती पैसे गुंतवावे असे लेखी आदेश देण्याचे कृत्य सहकार कायदा अस्तित्वात आल्यापासून महाराष्ट्र राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात केंव्हाही घडले नाही.** एवढेच नव्हे तर महाराष्ट्र राज्यात ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यामध्येच संस्था नोंदणीच्या वेळी खाते उघडण्यास परवानगी दिली जाते. **मात्र डिजीसी ला शेकडो-करोडो रुपयांची रक्कम सारस्वत को-ऑप. बँकेमध्ये गुंतविण्याची परवानगी सहकार आयुक्तांनी दिली हेच मुळात गौडबंगाल आहे.** याप्रकरणी राज्याचे संपूर्ण सहकार खाते व मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी हे त्या त्या काळात लेखी तक्रारी प्राप्त होवूनही गप्प कसे काय बसले ? ही बाब लोकशाहीत चिंतणीय व धक्का देणारी बाब आहे. एक राजरोसपणे केलेली नियमीतपणे बेकायदेशीर गोष्ट व तीही करोडो रुपयांची असताना लेखी तक्रार प्राप्त होवूनही मंत्रालयातील अधिकारी व राज्याचे सहकार आयुक्त व दुय्यम अधिकारी कसे काय आपल्या कर्तव्यात कसूर करू शकतात? याचा उलगडा होणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब ज्या पतसंस्थांनी करोडो रुपयांच्या रकमा डीजीसी मध्ये गुंतविल्या त्यांना टारगेट करणे म्हणजे **चोर सोडून संन्याशाला फाशी देण्याचे पाप या प्रकरणी न होण्यासाठी सदरहू प्रकरण सी.बी.आय.कडे देण्याची गरज आहे.** किती मोठे धाडस सतत तीन वर्षे नियमितपणे करण्यात आले, हे महाराष्ट्र राज्यासारख्या प्रगतशील राज्याला शरमेने मान खाली घालविणारी बाब ठरली आहे. सरकारने या प्रकरणी **ज्या पतसंस्थांनी डीजीसी मध्ये करोडो रुपयांच्या रकमा गुंतविलेल्या आहेत, त्यांना १५ टक्के व्याजदराने पुढे काही कारवाई करण्याच्या अगोदर मुद्दलासह रकमा परत देण्याचे सोपस्कर पूर्ण केले पाहिजे.** आणि महाराष्ट्र शासनाने स्वत: पुढाकार घेवून डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन सारख्या संस्थेची उभारणी करुन राज्यातील सर्व पतसंस्थांना त्यात समाविष्ट करुन घेतले पाहीजे व त्याच्या प्रिमियमचा दर प्रती १०० रुपये ठेवींसाठी ५ नये पैशांपेक्षा जास्त असता कामा नये. अन्यथा आजारापेक्षा औषधानेच म्हणजेच विम्याच्या हप्त्याने नफ्यात असलेली पतसंस्था तोट्यात नेण्याचे अव्यवहारीक धोरण मात्र स्विकारू नये. केवळ चौकशी, पोलीस केसेस, संचालक मंडळ बरखास्त करणे इत्यादी मृगजळात राज्यातील सर्वसामान्यांचा सहकार उधळून जाईल व ते पाप कोणीही आपल्या डोक्यावर कुणाच्या बचावासाठी कृपया घेवू नये. एकच महत्वाचे व्यवहारीक व संकेताला धरुन राज्यासमोर सांगावेसे वाटते की, ज्या संस्थेच्या नोंदणीच्या कालावधीत राजमुद्रेचा सर्रास वापर राज्याचे आय. ए. एस. अधिकारी, त्यांचे दुय्यम अधिकारी यांनी डीजीसी मध्ये रकमा गुंतविण्याचे लेखी आदेश, पत्रकार परिषदा मेळावे, वर्तमानपत्रातील रकानेच्या रकाने भरुन जात असताना, राज्यातील त्या पतसंस्थांचा किंवा चालकांचा यात कुठलाही दोष असू शकत नाही. किंबहूना त्यांना या प्रकरणी गोवणे अप्रस्तूत आहे.

सहकार कायद्याच्या कलम ७० प्रमाणे सहकारी संस्थांमधील निधी कुठे गुंतवायचा याची तरतूद कलम ७० मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे. आणि जिल्हा बँका व राज्य बँकेच्या व्यतिरिक्त निबंधकाने अपवादात्मक परिस्थितीत त्यांचे समाधान झाल्यानंतर गुंतवणूक करण्यास परवानगी देण्याचे अधिकार आहेत. केवळ या गोष्टीचा सोईस्कर अर्थ काढून कलम ७० चा दुरुपयोग झालेलाच दृष्टीक्षेपात येईल. राज्याची राज्य सहकारी बँक एवढी सक्षम असताना केवळ त्या शहरात राज्य बँकेची शाखा नाही. या कारणास्तव करोडो रुपये सारस्वत बँकेत गुंतविण्यास परवानगी देणे, यातच सर्व काही आलेले आहे. एवढेच नव्हे तर एवढ्या जिल्हा बँका का दूर ठेवण्यात आल्या याची सुध्दा उत्तरे मिळाली पाहीजेत.

**मुळ शोधणे आवश्यक आहे. डीजीसी ही संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था फेडरेशन पुरस्कृत असल्याचे राज्यातील सहकार आयुक्तांनी उपविधीमध्ये अंतर्भूत केलेले आहे.** आणि या फेडरेशनने सुध्दा सभासद-पतसंस्थाकडून करोडो रुपये ठेव रुपाने जमा करुन **डिजीसी मध्ये नोंदणीच्या वेळेस रक्कम कमी पडते म्हणून बेकायदेशीररित्या गुंतविण्याची परवानगी सहकार आयुक्तांनी दिलीच कशी ? व डिजीसीने त्या रकमा पुन्हा फेडरेशनला केंव्हा व कशा दिल्या ? हे सर्व गौड बंगाल अजून ऊघड व्हायचे आहे.** एकंदरीत डिजीसी व पतसंस्थांचे राज्य फेडरेशन यांचे रातोरात उपविधीमधील बदल ह्या थेट सहकार आयुक्तांच्या अखत्यारीतील बाबी आहेत.

**राज्याचे सहकार आयुक्त हे महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन व डिजीसी मध्ये पदसिध्द संचालक असताना दोन्ही ठिकाणी असे कसे उपविधी मंजूर केले ? ७ दिवसांत उपविधी दुरुस्त्या कशा मंजूर झाल्या ? पतसंस्थांकडून फेडरेशनने करोडो रूपये डिपॉझीट कसे घेतले ? व लगेच डिजीसी मध्ये कसे वळविले ? व डिजीसी आपले काम झाल्यावर चढ्या व्याजदराने फेडरेशनला करोडो रुपये कसे परत दिले ? व फेडरेशनने त्या करोडो रुपयांच्या रक्कमा पुन्हा त्या पतसंस्थांना परत कशा दिल्या ? म्हणजेच दोन खाजगी व्यापारी जसा व्यवहार करतात त्याप्रमाणे, फेडरेशन व डिजीसीने राजरोसपणे सहकार आयुक्तांच्या उपस्थितीत व्यवहार केले. परंतू पुन्हा मात्र कायम राहिला.** या सर्व गोष्टीला पतसंस्था कशा जबाबदार ? कारण दोन्ही ठिकाणी राजमुद्रा. खात्याची परिपत्रके व पुण्याच्या आयुक्त कार्यालयात सर्रास संबंधितांना राबता सर्व काही चित्तथरारक आहे.

म्हनूनच निबंधकाचे अधिकार प्रथम निबंधकांनी समजून घेतले पाहीजेत. अन्यथ: छोट्या कार्यकर्त्यांना येथून पुढे नेस्तनाभूत व्हावे लागेल व सहकार खात्याचे शिकार होवून अनेक जिवघेण्या कारवायांना सामोरे जावे लागेल. **यासाठी राज्य पतसंस्था फेडरेशन व डिजीसी यांच्या वेळोवेळी केलेल्या उपविधी दुरुस्त्या व केलेले करोडो रुपयांचे व्यवहार, केलेले पत्रव्यवहार तसेच शासकीय लेखापरिक्षण अहवाल व दोष दुरुस्ती अहवाल व त्यावर निबंधकाने केलेली कारवाई व संचालकांच्या विविध कालावधीत केलेल्या नियुक्त्या, सभा त्यातील ठराव हे तपासून पाहिले तर हा दोन राज्यव्यापी संस्थांमधील पुर्णपणे बेबनाव असल्याचे स्पष्ट होईल.** आता या सर्व घडामोडीला कालपरत्वे उत्तरे मिळतील. आरोप-प्रत्यारोप होतील व ही प्रकरणे कालबाह्य ठरविण्यासाठी व विसरुन जाण्यासाठी वेगळीच प्रकरणे बाहेर आणून राज्यातील १० कोटी जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविले तर आश्चर्य वाटायला नको. परंतु **सत्यमेव जयते ! सी.बी.आय. ने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. आणि न्याय देवता या कामी सक्षम आहे.**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र!! जय सहकार!!!**